**द्वितीय पक्षकाराकरीता द्वितीय पक्षकार साक्षीदार क्र. १ चा शपथेवर**

**अधिकचा सरतपास विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांचेमार्फत**

२९. मी दाखल केलेल्या शपथपत्रातील सर्व माहिती व मजकुर मी सांगितल्याप्रमाणे असून तो खरा व बरोबर आहे. सदरचा मजकुर मी वाचून त्यावर सही केली आहे.

दस्तऐवज यादी निशाणी क्रमांक ६० वरील दस्तऐवज यादी सोबत दाखल दस्तऐवजांना **निशाणी क्रमांक ६० (१) ते ६०(९)** देण्यात येते आहे.

**प्रथम पक्षकार क्र. १ तर्फे द्वितीय पक्षकार साक्षीदाराचा शपथेवरील**

**उलटतपास विधीज्ञ श्री. मोहोळकर यांचेमार्फत सुरू.**

३०. सन २००७ साली मी चार वर्षांचा होतो. सदरची कंपनी सन २००९ साली बंद पडली. हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ पासून मी कंपनीमध्ये कंपनीचे कामकाज बघण्याकरीता कधीही गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील कंपनीत काय काम करत होते हे मला माहीत नाही.

३१. प्रथम पक्ष कंपनीचे प्रॉफीट व लॉस अकौन्ट, Balance Sheet, Muster roll, Order sheet मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्ष कंपनीच्या शाखा कोठे कोठे आहेत हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कंपनीमध्ये १०० पेक्षा जास्ती कामगार काम करतात तसेच कंपनीच्या मालाला मागणी आहे हे दाखविण्याकरीता माझ्या शब्दाशिवाय काहीही कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही.

३२. कंपनीने बोगस कागदपत्रे तयार केल्याबाबत मी पोलिसांकडे तक्रार केली नाही. माझ्या वडीलांना रोखीने पगार मिळत होता. त्यांचा पी. एफ. व बोनस मिळत होता काय याबाबत मला माहिती नाही. मला माहिती नाही की डी लावल कंपनीत कार्यरत कर्मचा-यांना त्यांच्या बँक खात्यातच पगार मिळत होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील कंपनीमध्ये काय काम करतात हे मी प्रत्यक्ष कंपनीत जावून कधी पाहिले नाही. माझे वडील प्रथम पक्ष क्र. १ कडे नोकरीला होते. त्याबाबतचा पुरावा अभिलेखावर जॉब कार्ड म्हणून दाखल आहे.

३३. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील डी लावल कंपनीत कधीही काम करत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ते प्रथम पक्षकार क्रमांक २ कडे काम करत होते.

३४. Muster Roll, Order sheet, Bill Book, Stock Register हे का दाखल केले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, डी लावल कंपनीची उत्पादन प्रक्रिया नेमकी कोठे चालू आहे हे माझ्या शपथपत्रात नमूद आहे. ते परिच्छेद क्र. २४ मध्ये नमूद आहे, परिच्छेद क्र. २३ मध्ये नमूद नाही. कंपनीचे उत्पादन मी स्वत: जावून पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, डील लावल कंपनीचे उत्पादन तासवडे व्यतिरिक्त कोठेही सुरू नाही.

३५. मला माहीत नाही की, डी लावल कंपनीने माझ्या वडीलांना नेमणूक आदेश दिला होता किंवा कसे. मला माहीत नाही की, माझ्या वडीलांच्या पगारातून प्रोफेशनल टॅक्स वजा होत होता किंवा कसे. सन २००९ मध्ये कंत्राटदाराने कंपनीसोबतचा करार रद्द केल्याबाबत मला माहिती नाही. Tetra Laval Company, Tetra Pack Company and Sidel कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर कोण आहे याची मला माहिती नाही. Tetra Laval Company, Tetra Pack Company and Sidel या कंपन्यांचे Balance Sheet & Profit Loss Statement मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी कंपनीत २४० दिवस काम केले किंवा नाही हे दाखविण्याकरीता पुरावा नाही. माझ्या वडीलांना तोंडी हुकुमाद्वारे कामावरून कमी केले होते. त्याबाबत माझ्या वडीलांनी कंपनीकडे लेखी पत्र दिले किंवा कसे हे मला माहीत नाही. डी लावल कंपनीचे रजिस्ट्रेशन व कॉन्ट्रक्टरचे लायसन्स मी पाहिलेले नाही.

३६. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया आशयाचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास – संपला.</u>**
**<u>फेरतपास – काही नाही.</u>**

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत
वा.दा.व.अ.क.के

ठिकाण – सातारा.
दिनांक – ०६/०२/२०२६

( निखिल अ. गुप्ता )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सातारा.